सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग




थेट दूरध्वनी क्र. :- +९१-२२-२२६२ १२२०
दूरध्वनी केंद्र क्र.:- +९१-२२-२२६२ ०११४
विस्तारित क्र. :- १३८ (पोलीस उप आयुक्त (प्रकटी.)
६२९ (वाचक अधिकारी),
१२१ (स्टेनो), ६२८ (लेखनिक)
ई.मेल :- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

पोलीस उप-आयुक्त(प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार
( नवीन इमारत), चौथा मजला,
महात्मा फुले मंडई समोर
डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१

**क्रमांक पोउआ (प्रकटी)/जा.क्र. ५६५/२०२६** **दिनांक २१/०४/२०२६**

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई.

विषय :- Best Detection (उत्कृष्ट गुन्हे शोध) व Best Conviction (उत्कृष्ट अपराधसिध्दी) of the Month **March 2026** पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत.

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

**माहे मार्च -२०२६** करीता **'' बेस्ट डिटेक्शन अर्थात (उत्कृष्ट गुन्हे शोध) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात (उत्कृष्ट अपराधसिध्दी)''** याकरीता खालील नमुद पोलीस ठाणे यांची निवड करण्यात आलेली आहे. प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद **प्रपत्र 'क'** प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व अंमलदार यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ)**

- **माहे मार्च - २०२६ गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न**

१. **सायबर (प) पोलीस ठाणे**, सायबर, मुंबई गु.र.क्र. ४८/२०२५, कलम २०४, २०५, ३१९ (२) ३१८(४), ३६६(२), ३३८, ३३६(३), ३४० (२), ६१ भा.न्या.सं. सह कलम ६६ (ड) आय.टी ॲक्ट.

**ब)**

- **माहे मार्च - २०२६ सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी**

१) **निर्मल नगर पोलीस ठाणे**, परिमंडळ ०८, मुंबई गु.र.क्र. ४०७/२०२०, कलम ३०२, ३०७, ५०४, ५०६,३४ भा.दं.वि. सह ३७(१),१३५ म.पो.का. सह कलम ४,२५ भा.ह.का.

कृ.मा.पहा.......

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ) **माहे मार्च २०२६** बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/-
पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

**प्रत**:-

वरिष्ठ पोलीस निरीक्षक- वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :-**

दिनांक १०/०४/२०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **"Best Detection of the Month"** माहे **मार्च २०२६** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ मार्च २०२६ - ०१ गुन्हा

| | | |
|---|---|---|
| ०१ | **सायबर (प) पोलीस ठाणे**<br>सायबर, मुंबई. | **गु.र.क्र व कलम :-** ४८/२०२५, कलम २०४, २०५, ३१९ (२) ३१८(४), ३६६(२), ३३८, ३३६(३), ३४० (२), ६१ भा.न्या.सं. सह कलम ६६ (ड) आय.टी ॲक्ट |

### -: " ऑनलाईन फसवणुक " :-

नमुद गुन्हयात फि' यांच्या मो.क्र.वर संपर्क करुन Trai Department मधून बोलत असल्याचे सांगून तक्रारदार यांचे नावे असलेल्या मोबाईल क्रमांकावरुन लोकांना Threating Messages - फ्रॉड मेसेज जात आहेत त्यामुळे सायबर क्राईम डीपार्टमेंटमध्ये गुन्हा नोंद केल्याचे सांगून तसेच सायबर क्राईम येथे दाखल असलेल्या सुदिपकुमार यांच्या मनी लॉड्रींग केसमध्ये तक्रारदार यांचे बँक खात्यांचा वापर झाला असल्याचे सांगून त्यांना IPS ऑफीसर राजेश्वर प्रधान, सायबर क्राईम डीपार्टमेंट,दिल्ली,सुनिलकुमार गौतम सीबीआय अधिकारी यांनी संपर्क करुन तक्रारदार यांना मनी लॉड्रींगचे केसमध्ये अटक करण्याची भिती दाखवून सरकारी अधिकारी असल्याचे भासवुन Acknowledgement Letter Form Financial Department, Central Bureau of Investigation & Delhi Police यांच्या नावाचे बनावट कागदपत्रे पाठविली व तक्रारदार यांना गुन्हेगारी कृत्यात चौकशी करत असल्याचे सागुन त्यांना डिजिटल अरेस्ट करुन त्यांचे बँक खात्यामधून एकूण रु ३३,५०,००० एवढी रक्कम वेगवेगळया बँक खात्यामध्ये ट्रान्सफर करुन बनावटीकरणाद्वारे फसवणुक केली म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | श्रीमती मेघना देवेंद्र कामत, वय ४९ |
| फसवणुकीची मालमत्ता | :- | 33,50,000/- रूपये |
| हस्तगत मालमत्ता | :- | 8,95,500/- |
| आरोपी अटक व दिनांक | :- | १) अभिजीत शिल S/O स्वपन शिल वय २८<br>२) शंतनू सेन S/O शंकर सेन वय ३० व<br>३) सुब्राता बर्मन S/O निलकंटा बर्मन वय ३०<br>४) जयदेब रॉय चौधरी S/O संजय रॉय चौधरी वय ३४<br>**अटक दिनांक**:- ०८/०३/२०२६ |

- तपास:-नमुद गुन्हयातील फिर्यादी यांना संपर्क करण्यासाठी वापरलेल्या व्हॉटसअॅप मोबाईल क्रमांक +917629990855 व +916009219799 ची सिमकार्ड ही 05 संशयित IMEI क्रमांकामध्ये वापरण्यात आलेली होती.
- सदर 05 IMEI क्रमांकच्या तपशिलाचे सखोल विश्लेषण केले असता त्यामध्ये 09 महिन्यांच्या कालावधीमध्ये एकूण 1890 सिमकार्ड वापरण्यात आली असल्याचे दिसून आले.
- सदर 1890 सिमकार्डपैकी जवळपास 184 मोबाईल क्रमांकाची CDR प्राप्त करुन त्याचे तांत्रिक विश्लेषण केले असता त्यामध्ये सदरचे मोबाईल क्रमांक हे केवळ व्हॉटसअॅप या अॅपचे नवीन अकाऊंट क्रिएट करण्यासाठी आवश्यक असलेले रजिस्ट्रेशनचे OTP जनरेट करण्यासाठी वापरण्यात आल्याचे निष्पन्न झाले. वरील नमुद 184 मोबाईल क्रमांक हे NCCR पोर्टलवर डिजीटल अरेस्ट, इव्हेसमेंट, लोनअॅप यासारख्या गुन्हयामध्ये फिर्यादी यांना संपर्क करण्यासाठी वापरण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे.
- नमुद 05 IMEI क्रमांकांपैकी एका IMEI क्रमांकामध्ये इंसर्ट झालेल्या सिमकार्डस्ना लिंक असलेल्या ईमेल आय. डी. ची माहिती ही गुगलकडून प्राप्त केली असता त्यामध्ये 03 संशयित ईमेल आय.डी.ना 150 पेक्षा जास्त मोबाईल क्रमांक लिंक असल्याचे दिसून आले.
- वर नमुद 184 सिमकार्डचे CAF प्राप्त केले असता त्यातील 30 सिमकार्ड ही एकाच पी.ओ.एस. एजंट याने अॅक्टीव्हेट केले असल्याचे दिसून आले. त्याबाबत अधिक तांत्रिक माहिती प्राप्त केली असता डिजीटल अरेस्ट सारख्या गंभीर सायबर गुन्हयामध्ये वापरण्यात येणाऱ्या व्हॉटसअॅप अकाऊंटसाठी लागणाऱ्या भारतीय मोबाईल क्रमांक व्होडाफोन, जिओ कंपनीचा पुरवठा करणारा पी.ओ.एस. एजंट अटक **आरोपी क्रमांक** 01 **अभिजीत शिल**

हा असल्याचे निष्पन्न झाले.

- वर नमुद 03 संशयित ईमेल आय.डी. पैकी mrsen280@gmail.com या ईमेल आय डी हा आरोपी क्र 02 शंतनू सेन याचा असल्याचे निष्पन्न झाले असून सदर ईमेल आय.डी.स एकूण 169 मोबाईल क्रमांक लिंक असल्याचे दिसून आले. सदर मोबाईल हे विविध डिजीटल अरेस्ट सारख्या गंभीर गुन्हयामध्ये वापर झाला असल्याचे तसेच अटक आरोपी क्रमांक 01 यांचेकडून प्राप्त मोबाईल क्रमांकाचा पहिला रिचार्ज हा अटक आरोपी क्र 02 शंतनू सेन करत असल्याचे निष्पन्न झाले आहे.
- नमुद गुन्हयातील अटक आरोपी क्र 01 अभिजीत शिल याचेकडील भारतीय मोबाईल क्रमांकाचे सिमाकार्ड ही यातील पाहिजे आरोपी प्रितम सुत्रधार यास दिली जात होती. सदरचे सिमकार्डचे मोबाईल क्रमांक हे पाहिजे आरोपी प्रितम सुत्रधार हा अटक आरोपी क्र 03 सुब्राता बर्मन यास त्यांचे Ws Ot या व्हॉटसअॅप ग्रुपवर पाठवित असे. नमुद व्हॉटसअॅप ग्रुपमध्ये प्राप्त मोबाईल क्रमांकाचा वापर करून अटक आरोपी क्र 03 सुब्राता बर्मन हा त्यांचेकडील मोबाईल फोनद्वारे व्हॉटसअॅप अॅपचे ओ.टी.पी. जनरेट लॉग-ईन करत असे. सुब्राता बर्मन हा ०२ अँड्रॉईड फोनमध्ये प्रत्येकी 20 अशी एकूण 40 व्हॉटसअॅप अकाऊंट लॉग-ईन करून सदरचे मोबाईल फोन पाहिजे आरोपींना **सायबर गुन्हेगारीकरीता पुरवित असल्याचे निष्पन्न झाले आहे.**
- अटक आरोपी क्रमांक ०३ जयदेब रॉय चौधरी हा अटक आरोपी क्र ०१ याप्रमाणे बेकायदेशिरपणे पी.ओ.एस. एजंटचे काम करून त्याने पुरवठा केलेले मोबाईल क्रमांक डिजीटल अरेस्ट सारख्या गुन्हयात वापल्याचे निष्पन्न झाले आहे.
- एकंदरीत डिजीटल अरेस्ट यारख्या गंभीर सायबर गुन्हयामध्ये फिर्यादींशी संपर्क साधण्याकरीता व त्यांना धमकाविण्याकरीता आवश्यक असलेली भारतीय मोबाईल क्रमांकाच्या सिमकार्डचा पुरवठा करून व्हॉटसअॅप अकाऊंट उघडयासाठी ओ.टी.पी जनरेट करून मोबाईल फोनमध्ये क्लोनिंग अॅपच्या मदतीने एकाच वेळी ४० व्हॉटसअॅप अकाऊंटस लॉग-ईन करून सदर मोबाईल भारताबाहेरील **कंबोडीया** येथील सायबर गुन्हेगारांना पाठविले असल्याचे निष्पन्न झाले आहे.
- अटक आरोपी हे टेलिग्राम व लाईन अॅप यासारख्या अॅपच्या माध्यमातून डिजीटल अरेस्ट सायबर गुन्हे करणाऱ्या चायनिज व तैवानी सायबर गुन्हेगारांच्या संपर्कात असून सदर चायनिज व तैवानी सायबर गुन्हेगारांकडून त्यांना मोबाईलमध्ये भारतीय मोबाईल क्रमांकाचे व्हॉटसअॅप लॉग-ईन करून सदरचे मोबाईल फोन पुरविल्याच्या बदल्यात एका महिन्यामध्ये २७,००,०००/- रुपये एवढे कमिशन प्राप्त झाले असल्याचे निष्पन्न झाले आहे.
- मुंबईमध्ये प्रथमच डिजीटल अरेस्ट सायबर गुन्हे करणाऱ्या भारतातील शेवटच्या स्तरातील गुन्हेगारांना अटक करण्यात यश आले आहे.
- डिजीटल अरेस्ट यासारख्या गुन्हयाची सुरवात ही व्हॉटसअॅप कॉलिंगद्वारे होते. अटक आरोपी हे सदर कॉलिंग करीता लागणारी व्हॉटसअॅप अकाऊंट त्यांचेकडील मोबाईल फोनमध्ये लॉग-ईन करून ते कंबोडीया येथे पाठवित होते. सदर आरोपींना अटक केल्यामुळे डिजीटल अरेस्ट सारख्या सायबर गुन्हेगारीस आळा बसणेस मदत झाली आहे.

**आरोपीतांचा गुन्हयातील सहभाग -**

1) अभिजीत शिल s/o स्वपन शिल वय 28 वर्षे, ( व्होडाफोन व जीओ कंपनीचा पी.ओ.एस. एजंट व सिमकार्ड पुरविणारा)

2) शंतनू सेन s/o शंकर सेन वय 30 वर्षे, ( अटक आरोपी अभिजीत शिल याचेकडून सिमकार्ड घेवून त्याचे व्हॉटसअॅप ओटीपी व विविध अॅपद्वारे एकाच मोबाईलमध्ये मोठया प्रमाणात व्हॉटसअॅप लॉग-ईन करून यातील कंबोडीया येथील पुढील आरोपीतांना मोबाईल पुरविणारा)

3) सुब्राता बर्मन s/o निलकंटा बर्मन वय 30 वर्षे, ( अटक आरोपी अभिजीत शिल याचेकडून सिमकार्ड घेवून त्याचे व्हॉटसअॅप ओटीपी व विविध अॅपद्वारे एकाच मोबाईलमध्ये मोठया प्रमाणात व्हॉटसअॅप लॉग-ईन करून यातील कंबोडीया येथील पुढील आरोपीतांना मोबाईल पुरविणारा)

4) जयदेब रॉय चौधरी s/o संजय रॉय चौधरी वय 34 वर्षे, ( पी.ओ.एस. एजंट संजॉय दास याचे पी.ओ.एस. सिमकार्ड बेकायदेशिरपणे वापरून त्याद्वारे सिमकार्ड व सिमकार्ड पुरविणारा)

**सायबर (प) पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्रीमती. सुवर्णा उमेश शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | श्री. मंगेश नंदकिशोर मजगर | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहा.पोलीस निरीक्षक | श्रीमती. पुनम शिवाजी जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र. ०९०८०७ | केशव लक्ष्मण तकीक | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र. १९११२३ | प्रितम काकासाहेब व्यवहारे | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :-**

दिनांक १०/०४/२०२६ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“Best Conviction of the Month”** माहे मार्च २०२६ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ मार्च २०२६ - ०१ गुन्हा

| | | |
|---|---|---|
| ०१ | **निर्मल नगर पोलीस ठाणे,** परिमंडळ ०८, मुंबई. | **गु.र.क्र व कलम**:- ४०७/२०२०, कलम ३०२,३०७,५०४, ५०६,३४ भा.दं.वि. सह ३७(१),१३५ म.पो.का. सह कलम ४,२५ भा.ह.का. |

### -: “ धारधार सुऱ्याने वार करून गंभीर जखमी करून जीवे ठार मारणे ” :-

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :-** नमूद गुन्हयात बांद्रा टर्मिनस ब्रीजच्या खाली गेट नं. १८, येथील फि’ च्या पानटपरीवर समीर खान व त्याचा मित्र साहु यांनी सिगरेट देण्याच्या कारणावन फरमान व अनस यास शिवीगाळ करून धमकी देवून समीर खान याने फिर्यादी व त्यांचा मुलगा अनस याचेवर धारदार सुऱ्याने वार करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला व त्यांचा मुलगा मुदस्सिर याचे गळयावर डाव्या बाजूस धारदार सुऱ्याने वार करून गंभीर जखमी करून जीवे ठार मारले म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :- | श्रीमती नूरजहाँ तहव्वर खान, वय ४५ |
| **निकाल दिनांक** | :- | **२०/०३/२०२६** |
| **बळीत/मयत** | :- | मुद्दसिर तहव्वर खान, वय २५ (मयत) |
| **अटक आरोपी व अटक दिनांक** | :- | १) शेहजाद उर्फ साहू अब्दुल सत्तार शेख,<br>२) समीर रफिक खान उर्फ सामी खान<br>**अटक दिनांक**:- १०/१२/२०२० |
| **दोषसिध्दीचा तपशील** | :- | नमुद गुन्हयात श्री. आर.एस आराध्य मा. अत. सत्र न्यायालय कोर्ट क्र.०५, मुंबई यांनी दि.२०/०३/२०२६ रोजी गुन्हयातील आरोपीतास<br>१) कलम ३०२, भादवि. मध्ये आरोपीला जन्मठेपेची शिक्षा व रू.५०००/- दंड<br>२) कलम ३०७ भां.द.वि. मध्ये १० वर्षे शिक्षा व ५०००/-रुपये दंड<br>३) कलम ५०४ भां.द.वि. मध्ये १ वर्षे शिक्षा व २०००/- रुपये दंड<br>४) कलम ५०६ भां.द.वि. मध्ये २ वर्षे शिक्षा व २००० रुपये दंड<br>५) कलम २५ भा.ह.का. मध्ये २ वर्षे शिक्षा व ३००० रुपये दंड<br>६) कलम १३५ महाराष्ट्र पोलीस ॲक्ट मध्ये ६ महिने शिक्षा व २००० रुपये दंड. ही सजा सुनावण्यात आली. |

**तपास कौशल्य** :- गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास अधिकारी यांनी गुन्हयांचा बारकाईने तपास करून साक्षीदार निष्पन्न करून साक्षीदारांकडे सखोल तपास करून गुन्हयाच्या अनुषंगाने पुराव्याची योग्य मांडणी करून आरोपीविरुध्द सबळ पुरावा प्राप्त केला व मा. न्यायालयात आरोपीविरुद दोषारोपपत्र दाखल केले तसेच कोर्ट कारकून यांनी साक्षीदार व पंच यांना साक्ष देतेवेळी त्यांना त्यांचे साक्षचे अनुषंगाने योग्य ते मार्गदर्शन केल्याने सदर गुन्हयातील आरोपीस मा. न्यायालयात शिक्षा होण्यास मदत झाली.

नमुद गुन्हयात दोषसिध्दी प्राप्त करून गुन्हयातील आरोपीस शिक्षा मिळणेकरीता तपासी पथकातील तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**निर्मल नगर पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्री. फिरोजखान अन्वरखान पठाण | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | श्री. संजय गुंडाप्पा चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहा.पोलीस निरीक्षक | श्री. ब्रम्हानंद विठ्ठलराव सूर्यवंशी | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ह.क्र.००३९१ | धर्मेंद्र दलपत धनु | प्रशस्तीपत्रक |
| ५ | म.पो.शि.क्र.११३६७० | कल्पना अमोल जाधव | प्रशस्तीपत्रक |

...............................

**टिप:-** वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, युनिट ११-गुप्रशा, गुअवि व घाटकोपर पोलीस ठाणे यांना "Best Detection of the Month **March 2026**" तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्ष-कांदिविली युनिट, गुन्हे शाखा व दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई यांना "Best Conviction of the Month **March 2026**" या करीता निवड झाली असून, कळविण्यात येते की राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of the Month) व सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी (Best Conviction of the Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद **प्रपत्र 'क'** प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व अंमलदार यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## ‘प्रपत्र ‘क’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे/गु.र.क्र. | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) F.I.R प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब, शवविच्छेदन अहवाल, ओळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे/गु.र.क्र. | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)** पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Recovery of the Month

## 'प्रपत्र ' क '

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे/गु.र.क्र. | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गेलेला माल | |
| ०५ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०६ | गुन्हा उघडकीस आणणारे अधिकारी, अंमलदार | |
| ०७ | गुन्हा उघडकीस आला तारीख | |
| ०८ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १० | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ११ | भा.द.वि. कलम ४११ ते ४१४ प्रमाणे कारवाई केली आहे का? | |
| १२ | मोका अंर्तगत कारवाई केली असल्यास आरोपीची मालमत्ता जप्ती प्रक्रियेबाबत केलेल्या कारवाईचे विवरण | |
| १३ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, केस क्रमांक, न्यायालय | |
| १४ | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी केलेल प्रयत्न.<br>a) घटनास्थळावरून प्राप्त पुरावे ( घटनास्थळ पंचनामा जोडावा)<br>b) तपासलेले साक्षीदार संख्या<br>c) गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सांक्षीदारांची कशी मदत झाली<br>d) Dog Squad ph enr<br>e) Fingerprint / Handwriting Expert ph enr<br>f) Cyber Expert ph enr<br>g) FORENSIC Expert ph enr<br>h) CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence माहिती<br>i) गुन्हेगारां संदर्भातील रेकॉर्ड /हिस्ट्रीशीट KCR इतर तपासले असल्यास त्या संदर्भातील इतर गुन्हयांची माहिती<br>J) गुप्त बातमीदार /गोपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली<br>k) परत मिळालेल्या मालाची कार्यकारी दंडाधिकारी समोर ओळख पटवली आहे का ?<br>l) मौल्यवान मालाचे मुलयांकन करून घेतले आहे का ? | |
| १५ | तपासाकरीता योगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केल्याची प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs ………………………………., Designation- …………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2025 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated / pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2026